UNIVERSITY OF MUMBAI

No.UG/ 307 of 2008.

**CIRCULAR :-**

A reference is invited to the Ordinance, Regulations and syllabi relating to the Master of Arts (M.A) ( Parts – I & II ) degree examination **vide** this office Circular No. UG/ 315 of 2005 dated 5th August, 2005 and No.UG/ 281 of 2007 dated 16th June, 2007 and the Head of the University Department of Marathi and the Principals of the affiliated Colleges in Arts and the Professor-cum-Director, Institute of Distance Education are hereby informed that the recommendation made by the Board of Studies in Marathi at its meeting held on 8th April, 2008 has been accepted by the Academic Council at its meeting held on 15th April, 2008 **vide** item No. 4.68 and that, in accordance therewith, एम.ए.( भाग-२ ) अभ्यासपत्रिका क्रं.२,४,६ व ८ (लोकसाहित्य) या अभ्यासपत्रिकांच्या घटक विषयाचे स्वरुप व प्रश्नपत्रिकांचे स्वरुप निश्चित करण्यात आलेले आहेत. तसेच संदर्भग्रंथांच्या यादीमध्ये भर घालण्यात आलेली आहे व शैक्षणिक वर्ष २००८ ते २०११ या तीन वर्षासाठी जोडलेल्या परिशिष्टाप्रमाणे अभ्याक्रम निश्चित करण्यात येत आहे.

MUMBAI-400 032
14th July, 2008

PRIN. K.VENKATARAMANI
REGISTRAR

To,

The Head of the University Department of Marathi and the Principals of affiliated Colleges in Arts and the Professor-cum-Director, Institute of Distance Education.

A.C/4.68/15/04/2008

******************

No. UG/307 -A of 2008 MUMBAI-400 03 14th July, 2008

Copy forwarded with compliments for information to :-

1) The Dean Faculty of Arts,
2) The Chairperson, Board of Studies in Marathi.
3) The Controller of Examinations,
4) The Co-Ordinator, University Computerization Centre,

( D.H. KATE )
**DEPUTY REGISTRAR**
U.G./P.G.Section.

Copy to :-

The Director, Board of College and University Development, the Deputy Registrar (Eligibility and Migration Section), the Director of Students Welfare, the Executive Secretary to the to the Vice-Chancellor, the Pro- Vice-Chancellor, the Registrar and the Assistant Registrar, Administrative sub-center, Ratnagiri for information.

The Controller of Examinations (10 copies), the Finance and Accounts Officer (2 copies), Record Section (5 copies), Publications Section (5 copies), the Deputy Registrar, Enrolment, Eligibility and Migration Section (3 copies), the Deputy Registrar, Statistical Unit (2 copies), the Deputy Registrar (Accounts Section), Vidyanagari (2 copies), the Deputy Registrar, Affiliation Section (2 copies), the Director University Computer Center (IDE Building), Vidyanagari, (2 copies) the Deputy Registrar (Special Cell), the Professor-cum- Director, Institute of Distance Education, (10 copies) the Deputy Registrar, (PRO) the Assistant Registrar, Academic Authorities Unit (2 copies) and the Assistant Registrar, Executive Authorities Unit ( 2 copies). They are requested to treat this as action taken report on the concerned resolution adopted by the Academic Council referred to in the above ... will be sent in this connection. the Assistant ... Account Unit V (1 copy).

Scanned with OKEN Scanner

Enclosure to Item No. 4.68
15.4.2008

# UNIVERSITY OF MUMBAI

Revised Syllabus

For

M.A. (Part-II)

in

Marathi

(With effect from the academic year 2008-2011)

Scanned with OKEN Scanner

एम्. ए. भाग २ (मराठी)

अभ्यासपत्रिका क्र. २

(प्राचीन कालखंडाचा अभ्यास: बहामनी काळ)

२००८ ते २०११ या तीन शैक्षणिक वर्षांसाठी

या अभ्यासपत्रिकेमध्ये बहामनी कालखंडाचा अभ्यास करावयाचा आहे. हा अभ्यास समकालीन राजकीय सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक पार्श्वभूमी व वाङ्मयीन प्रेरणांच्या संदर्भात करणे अपेक्षित आहे.

कालखंडातील महत्त्वाचे कवी

१) संत एकनाथ व नाथपंथ

२) पंडित कवी मुक्तेश्वर

यांचा उपरोक्त सर्व बाजूंनी अभ्यास अभिप्रेत.

संदर्भसूची - १. एकनाथ व्यक्ती आणि वाङ्मय - न. र. फाटक

~~२. श्रीधर व्यंकटेश~~

२. महाराष्ट्रीयांचे काव्यपरीक्षण - श्रीधर व्यंकटेश केतकर

३. मराठी वाङ्मयाभिरुचीचे विहंगमावलोकन - श्री. के. क्षीरसागर

४. संत साहित्याची सामाजिक फलश्रुती - गं. बा. सरदार

५. मुक्त-मयुरांची महाभारते - डॉ. भ. म. भिंगारे

६. पाच संतकवी - शं. गो. तुळपुळे

७. ~~एकनाथ~~ ज्ञानमयुरांची कविता - मा. ना. आचार्य

८. साहित्य समाज आणि संस्कृती - दिगंबर पाध्ये

९. एकनाथांची भारुडे - डॉ. गोसावी

१०. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास - ह. श्री. शेणोलीकर

११. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास - अ. ना. नसिराबादकर

१२. महाराष्ट्र साहित्य परिषद खंड १, २, ३

१३. महाराष्ट्र सारस्वत - वि. ल. भावे

१४. सकलसंतगाथा

पत्रिकेचे स्वरूप - १०० गुण, एकूण ५ प्रश्न, प्रत्येकी २० गुणांचे (अंतर्गत पर्याय असतील)

पहिला प्रश्न तात्त्विक स्वरूपाचा व अनिवार्य

प्रश्न क्र. २ ते ४ टिपणी किंवा ~~द्विर~~ टिपा अशा स्वरूपाचे असावेत.

— x —

एम. ए. भाग 2 (मराठी)

अभ्यासपत्रिका क्रमांक ४ : साहित्यशास्त्र



बी. ए पदवीपर्यंत भारतीय साहित्यशास्त्रातील प्रमुख सिद्धांतांचे ज्ञान विद्यार्थ्यांना मिळालेले असते. या पूर्वज्ञानाच्या पार्श्वभूमिवर पाश्चात्त्य साहित्यशास्त्रातील महत्त्वाच्या सिद्धांतांचे व संकल्पनांचे यथोचित ज्ञान करून घेणे.

भारतीय व पाश्चात्त्य साहित्यशास्त्रातील साम्य-भेदांचा आवश्यक तेथे निर्देश करणे. हे साम्य-भेद ओळखण्याची वाड्मयीन जाण विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे.

साहित्य आणि साहित्यविषयक प्रश्न यांचा अनेकविध दृष्टिकोणातून विचार करण्याची दृष्टी देणे. त्यासाठी लागणारे आवश्यक ते वाड्मयीन संकल्पनाव्यूह, अन्य ज्ञानव्यूह, नमुनारूपे (मॉडेल्स) इत्यादी उपकरणे वा आयुधे उपलब्ध करून देणे.

एकंदर साहित्य-समीक्षाव्यापार जाणून घेण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांची 'वाड्मयीन ज्ञान वाढविणे.

Scanned with OKEN Scanner

अभ्यासविषय :

1. साहित्य म्हणजे काय?

अ. भारतीय व पाश्चात्य साहित्यशास्त्रकारांनी साहित्यस्वरूपासंबंधी केलेल्या विविध व्याख्या / लक्षणे आणि त्यांची चिकित्सा.

ब. साहित्यकृती म्हणजे काय? ही संकल्पना व तिची विविध अंगे.

क. i) प्लेटो व ॲरिस्टॉटल यांचा अनुकृतिसिद्धांत

ii) आविष्कारवादी सिद्धांत.

2. साहित्याचे प्रयोजन

भारतीय साहित्य(शास्त्रा)तील प्रयोजनविचाराचा स्थूल आढावा

पाश्चात्य साहित्यशास्त्रातील कलावादी (रूपवादी) व जीवनवादी या दोन सिद्धांतपरंपरांच्या दृष्टीतून प्रयोजनविचार. (डॉ. रा.भा. पाटणकर यांच्या 'सौंदर्यमीमांसा' या ग्रंथातील 1) कला आणि सत्य 2) कला आणि नीती व 3) कला आणि रूप या प्रकरणांच्या आधारे.)

3. साहित्याची निर्मिती व आस्वाद यांमधील कल्पनाशक्तीचे कार्य.

भारतीय साहित्यशास्त्रातील प्रतिभाशक्तीच्या विचाराचा आढावा

कांट व कोलरिज यांनी मांडलेला कल्पनाशक्तीचा सिद्धांत.

Scanned with OKEN Scanner

साहित्यातील प्रवृत्ती आणि विचारप्रणाली.
1) स्वच्छंदतावाद. 2) मार्क्सवाद.
3) वास्तवतावाद. 4) अस्तित्ववाद.

साहित्याची भाषा आणि शैलीविचार.
अ. साहित्याची भाषा या घटकविषयांतर्गत
i) रोमान याकोब्सनचा भाषाविषयक विचार.
a. समांतरतेचा विचार.
b. भाषिक कार्याभिव्यक्तिचे नमुनारूप.
ii) मुकारोव्हस्कीचा नियमोल्लंघनाचा सिद्धांत.
ब. शैलीविचार या घटकांतर्गत पाश्चात्य शैलीविचाराची मांडणी. *

साहित्याचे प्रकार: वर्गीकरणाची तत्त्वे आणि प्रकाराची समीक्षा.

4. साहित्यातील मूल्यविचार: सौंदर्यमूल्ये व सौंदर्येतर मूल्ये यांचा विचार.

* (साहित्याची भाषा गंगाधर पाटील यांच्या कवितेची सौंदर्य-सर्जक भाषा या 'समीक्षेची नवी रूपे' या ग्रंथातील लेखाच्या व अनुष्टुभ जाने-फेब्रु.८२ मधील चिह्नमीमांसा विशेषांक ५ च्या आधारे व शैलीविचार भालचंद्र नेमाडे यांच्या 'साहित्याची भाषा, मिलिंद मालशे यांच्या आधुनिक भाषाविज्ञान: सिद्धांत आणि उपयोजन आणि रमेश धोंगडे यांच्या शैलीवैज्ञानिक समीक्षा या ग्रंथांच्या आधारे)

Scanned with OKEN Scanner

संदर्भग्रंथ:


१. साहित्य आणि सौंदर्य, बा. सी. मर्ढेकर
२. कला आणि मानव (अनु.) रा. भि. जोशी, बा सी. मर्ढेकर
३. भारतीय साहित्यशास्त्र, ग. त्र्यं. देशपांडे
४. साहित्य : स्वरूप आणि समीक्षा, वा. ल. कुलकर्णी
५. साहित्यविचार, दि. के. बेडेकर
६. छांदसी, पु. शि. रेगे
७. खडक आणि पाणी, गंगाधर गाडगीळ
८. सौंदर्यमीमांसा, रा. भा. पाटणकर
९. सौंदर्यानुभव, प्रभाकर पाध्ये
१०. कविता आणि प्रतिमा, सुधीर रसाळ
११. वाङ्मयीन वाद: संकल्पना व स्वरूप (संपा.) सीताराम रायकर व इतर
१२. वाङ्मयीन महत्ता, (संपा.) सरोजिनी वैद्य व इतर
१३. साहित्यसिद्धांत, (अनु.) स. गं. मालशे
१४. समीक्षेची नवी रूपे- गंगाधर पाटील
१५. साहित्याची भाषा, भालचंद्र नेमाडे
१६. आधुनिक भाषाविज्ञान: सिद्धांत आणि उपयोजन, मिलिंद मालशे
१७. शैलीवैज्ञानिक समीक्षा- डॉ. रमेश धोंगडे
१८. काव्यशास्त्रप्रदीप- ~~स. श्री. जोग~~ स. रा. गाडगीळ
१९. अभिनव काव्यप्रकाश - रा. श्री. जोग
२०. साहित्यशास्त्र: स्वरूप आणि समस्या वसंत पाटणकर
21. Theory of Literature, Rene Wellek & Austin Warren
22. Critical Approaches to literature, Daiches David
23. 20th Centuary Literary Criticism : A Reader (ed.) Lodge, David.
24. Modern Criticism And Theory : A Reader (ed) Lodge, David
25. नियतकालिक अनुष्टुभ जाने-फेब्रु ०२- केरव चिह्नमीमांसा लेखक गंगाधर पाटील


→

प्रश्नपत्रिकेचे स्वरूप. प्रश्नपत्रिका (१०० गुण.) प्रत्येकी २० गुणांचे ५ प्रश्न. प्रत्येक प्रश्नामध्ये दीर्घोत्तरी प्रश्न, दोन विकल्प- अंतर्गत पर्यायासह. घटकनियमांचे अंतर्गत पर्याय सतत बदलतील.

# एम.ए. भाग 2 (मराठी)

## अभ्यासपत्रिका क्रमांक ६ : उपयोजित समीक्षा

२००८ ते २०११ या तीन शैक्षणिक वर्षांसाठी

साहित्यकृतीत अनेक घटक असतात आणि त्यांचं संयोजन विविध प्रकारे झालेलं असते. म्हणून असे म्हटले जाते की साहित्यकृती ही अनेक अंगांनी व स्तरांनी संघटित झालेली एक बहुस्तरीय एकजिनसी समष्टी असते. साहित्यकृतीच्या या विशेषाबरोबरच तिला लेखक, वाचक, भाषा व संस्कृती यांचा संदर्भ असतो. साहित्यकृतीच्या या अनेकांगी व व्यामिश्र समष्टिरूपाचे अर्थग्रहण, सौंदर्यग्रहण व मूल्यमापन एकाच प्रकारच्या वाङ्मयीन दृष्टीतून व समीक्षापद्धतीतून केले तर तिची समीक्षा व अभ्यास ही पुष्कळदा एकांगी होण्याची शक्यता असते; म्हणून तिच्या समग्र रूपाचे समीक्षण व साहित्याचा एकंदर अभ्यास करण्यासाठी विविध प्रकारच्या वाङ्मयीन दृष्टिकोण, समीक्षापद्धती व जीवनदृष्टी यांची उचित जाण अभ्यासकाला आवश्यक असते.

हे सारे ध्यानात घेता विविध प्रकारच्या वाङ्मयीन दृष्टिकोणातून वा समीक्षापद्धतीतून साहित्यकृतींचे समीक्षण करण्यासंबंधीचे मार्गदर्शन व प्रशिक्षण उपकारक ठरते. त्यादृष्टीने समीक्षण करण्यास साह्यभूत होतील अशा प्रमुख समीक्षापद्धतींचा वा वाङ्मयीन दृष्टिकोणांचा परिचय करून देणे आवश्यक ठरते. हा परिचय करून देताना त्या समीक्षापद्धतींच्या तात्त्विक व उपयोजित (Theoretical and Applied) अंगांचे स्वरूप स्पष्ट करून सांगणे युक्त असते. आणि त्यादृष्टीने विशिष्ट समीक्षापद्धती डोळ्यासमोर ठेवून साहित्यकृतींच्या समीक्षणाची प्रात्यक्षिके विद्यार्थ्यांकडून करून घेणे उपयुक्त ठरते.

अशाप्रकारच्या प्रात्यक्षिकांतून आणि प्रशिक्षणातून विद्यार्थ्यांची साहित्यविषयक सौंदर्यदृष्टी व समीक्षादृष्टी अधिकाधिक मर्मग्राही, निकोप, लवचीक व सर्वसमावेशी व्हावी व त्यांच्या अंगी स्वतंत्र दृष्टीने समीक्षा करण्याची क्षमता यावी, ही या अभ्यासपत्रिकेची प्रमुख उद्दिष्टे आहेत.

प्रत्येक समीक्षापद्धतीला दोन अंगे असतात. एक तिचे तात्त्विक अंग आणि दुसरे तिचे उपयोजित अंग.

एकेका समीक्षापद्धतीची ऐतिहासिक पार्श्वभूमी, तिची मराठीतील परंपरा, तिची

तात्त्विक भूमिका आणि तिचे स्वरूपविशेष यांचे विद्यार्थ्यांना ज्ञान करून देणे. तसेच प्रत्येक समीक्षापद्धतीची मर्यादा स्पष्ट करणे, हा पहिला भाग असून समीक्षापद्धतींच्या समीक्षादृष्टीनुसार विविध साहित्यप्रकारांतील साहित्यकृतींचे समीक्षण करून दाखवणे व काही साहित्यकृतींची समीक्षणात्मक प्रात्यक्षिके विद्यार्थ्यांकडून करवून घेणे. साहित्यकृतींचा अभ्यास करताना एखादी समीक्षापद्धती अपुरी पडत असेल तर त्या ठिकाणी तिची मर्यादाही स्पष्ट करणे, हा दुसरा भाग आहे.

प्रात्यक्षिकांसाठी / उपयोजनासाठी कविता, कादंबरी व नाटक या प्रमुख प्रकारांतील साहित्यकृती व विशेष अभ्यासासाठी निवडलेल्या दोन पद्धती मराठी अभ्यासमंडळ वेळोवेळी निश्चित करते.

अभ्यासविषय :

१. समीक्षा म्हणजे काय?

२. समीक्षेची उद्दिष्टे.

३. समीक्षापद्धती : तात्त्विक अंग

(अ) रूपनिष्ठ.

(आ) मानसशास्त्रीय.

(इ) आदिबंधात्मक.

(ई) समाजशास्त्रीय.

(उ) स्त्रीवादी.

४. समीक्षापद्धतींचे उपयोजन :

अ. रूपवादी (अनिवार्य)

ब. मानसशास्त्रीय

(पुढे पाहा.)

५. प्रत्यक्ष उपयोजनासाठी नेमलेल्या साहित्यकृती :

(अ) कादंबरी :

१) वज्राघात - ह. ना. आपटे

२) सावित्री - पु. शि. रेगे

(आ) नाटक :

१) राजा इडिपस - सदानंद रेगे

२) महानिर्वाण - सतीश आळेकर

(इ) कविता :

१) नामदेवांचा अभंग -

"निवृत्तिदेव म्हणे करितां समाधान ।
कांहीं केल्या मन राहत नाहीं ॥१॥
बांधल्या तळ्याचा फुटलासे पाट ।
ओघ बारा वाटे मुरडताती ॥२॥
बांधल्या पेंढीचा सुटलासे आळा ।
तृण रानोमाळा पांगलेसे ॥३॥
हरिणीविण खोपी पडियेली वोस ।
दशदिशा पाडस भ्रमताती ॥४॥
मायबापें आम्हां त्यागियेलें जेव्हां ।
ऐसे संकट तेव्हां झालें नाहीं ॥५॥
नामा म्हणे देवा पेटला हुताशन ।
करा समाधान निवृत्तीचें ॥६॥

२) बा. भ. बोरकर - 'ज्ञानदेव गेले तेव्हा -'
बोरकरांची निवडक कविता 'चांदणवेल'
संपा. कुसुमाग्रज आणि गो. म. कुलकर्णी
कॉंटिनेंटल प्रका. पुणे (पृ. ७५).

३) कुसुमाग्रज - 'नट' - मुक्तायन पृ. क्र. ५

४) पद्मा गोळे - 'लक्ष्मणरेषा' ~~कवि~~ कविता विसाव्या शतकाची
संपा. शांता शेळके पृ. क्र. १८०
उत्कर्ष प्रकाशन पुणे
प्रथमावृत्ती २०००

५) दिलीप चित्रे - 'बहिऱ्या मुक्यांची दिंडी' - कवितेनंतरच्या कविता
वाचा प्रकाशन, औरंगाबाद
पृ. क्र. १२९

६) नारायण कुलकर्णी कवठेकर 'गर्दी' कविता विसाव्या शतकाची
संपा. शांता शेळके पृ. क्र. ३२२-२३
उत्कर्ष प्रकाशन पुणे
प्रथमावृत्ती २०००

७) र. कृ. जोशी 'तुझं माझं काही नाही' कविता विसाव्या शतकाची
पृ. क्र. ३५२-५३

८) वसंत गुर्जर 'आपण माणूस म्हणून जन्माला आलो' कविता विसाव्या शतकाची
पृ. क्र. ~~३०४-५६~~ ३०५, ३०६

९) अरुणा ढेरे 'रंगमहाली विहरत्या' निरंजन
अरुणा ढेरे, सुरेश एजन्सी
पुणे पृ. क्र. ९

१०) विवेक मोहन राजापुरे 'डॉक्यूमेंटरी' ~~आत्मवृत्त~~ सामोरा
विविध प्रकाशन १९८५
पृ. क्र. २४, २५, २६

११) निरंजन उजगरे 'रक्तापासून तुटणं कसं असतं?' तत्कालीन
मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई
पृ. क्र. ३२, ३३

१२) सुचिन्हा भागवत 'ग्लोबल वॉल्स' नव-अनुष्टुभ
अंक, सप्टें.-डिसें. २००६
पृ. क्र. ९८

संदर्भग्रंथ :


१. *रसास्वाद : साहित्य आणि कला*, माधव आचवल.
२. *समीक्षेची नवी रूपे*, गंगाधर पाटील.
३. *नवसमीक्षा*, (संपा०) गो० म० कुलकर्णी.
४. *त्रिदल*, (संपा०) शेख.
५. *वाङ्मयीन वाद*, (संपा०) गो०-मा० पवार. सीताराम रायकर आणि इतर
६. *मार्क्सवाद*, के० रं० शिरवाडकर.
७. *साहित्य आणि निर्मिती*, दि० के० बेडेकर.
८. *साहित्य आणि जीवन*, शरच्चंद्र मुक्तिबोध.
९. *स्त्री-पुरुष तुलना*, ताराबाई शिंदे.
१०. *भारतीय स्त्रीजीवन*, गीता साने.
११. *स्त्रीवादी समीक्षा : स्वरूप आणि उपयोजन*, अश्विनी धोंगडे.
१२. *अपौरुषेय*, अश्विनी धोंगडे.
१३. *संदर्भ स्त्रीपुरुष*, अश्विनी धोंगडे.
१४. *समीक्षेतील नव्या संकल्पना*, (संपा०) मनोहर जाधव, या ग्रंथातील 'स्त्रीवादी समीक्षा'—अरुणा दुभाषी यांचा लेख व मंगला वरखेडे यांचा लेख.
१५. *स्त्री-प्रश्नांची वाटचाल*, विद्युत भागवत.
१६. *एकेक पान गळावया आणि नंतर*, पुष्पलता राजापुरे-तापस.
१७. 'अनुष्टुभ्', सप्टेंबर-ऑक्टोबर, १९९६.
१८. *Understanding of Poetry*, Books Cleanth & Robert Penn Warren.
१९. *Five Approaches of Literary Criticism*, Scott, Wilbur S.
२०. *Modern Literary Theory : A Comparative Introduction*, Jefferson, Ann & David Robey.
२१. *Second Sex*, Simone De Beauvoir.
२२. मराठी शोकांतिका : नवविचार डॉ. पुष्पलता राजापुरे-तापस
23 महानिर्वाण संस्मरणे - संपा. रेखा इनामदार-साने

११

प्रा. गंगाधर पाटील यांचे लेख (संदर्भासाठी)

अनुष्टुभ अनिमा आणि आनिमस जुलै-ऑगस्ट ८७

अर्थनिर्णयनमीमांसा मे-जून ९८

आशयसूत्र आणि आशयसूत्रमीमांसा मार्च-एप्रिल २००२

ऐक जरा ना जुलै-ऑगस्ट ~~८६~~ ८६

कथनमीमांसा सप्टें-डिसेंबर १९९१

~~स्त्रीमन संवाद जाने-फेब्रु ९९~~

वाचक प्रतिसादमुखी समीक्षा - मार्च-एप्रिल ९८

साहित्यकृतीचे स्वरूप आणि तिचे वाचन. जुलै-ऑगस्ट ८८

" " सप्टें-डिसें ८८

साहित्यसमीक्षेचे स्वरूप सप्टें-ऑक्टो ८७

" नोव्हें-डिसें ८७

" मार्च एप्रिल ८९

साहित्यसमीक्षेचे स्वरूप-अर्थनिर्णयन सप्टें-डिसें ८९

साहित्यसमीक्षेचे स्वरूप-वाङ्मयीन विश्लेषण जाने-फेब्रु ८९

" मे-जून ८९

स्त्रीवादी साहित्यसमीक्षा सप्टें-ऑक्टो ९८

गाणारे झाड जुलै-ऑगस्ट ७८

साहित्याची महानता जुलै-ऑगस्ट ९०

आस्वाद कवितेचा सप्टें ते डिसेंबर ९५

प्रश्नपत्रिकेचे स्वरूप - १०० गुण (प्रत्येकी २० गुणांचे ५ प्रश्न)

प्रश्न पहिला अभ्यासविषय १ व २ वर आधारित
(समीक्षा म्हणजे काय, तिची उद्दिष्टे व तिचे घटक/निकष यांवर) आधारित

प्रश्न दुसरा उपयोजनासाठी नेमलेल्या समीक्षापद्धती वगळून अन्य समीक्षापद्धतींच्या तात्त्विक स्वरूपावर ~~नेमलेल्या साहित्यकृतींवर~~ आधारित

प्रश्न तिसरा, चौथा व पाचवा उपयोजनासाठी नेमलेल्या समीक्षापद्धती व साहित्यकृती यांवर आधारित

प्रश्न १ ते ४ यांना अंतर्गत पर्याय असावेत.
प्रश्न पाचवा अनिवार्य असावा.

---

एम.ए. भाग २ (मराठी)

अभ्यासपत्रिका क्रमांक ८ : लोकसाहित्य

२००८ ते २०११ या तीन शैक्षणिक वर्षांसाठी)

भाषा, साहित्य आणि संस्कृती यांच्या घडणीत लोकसाहित्याचा फार मोठा सहभाग असतो. ललित साहित्य आणि लोकसाहित्य यांच्या निर्मितिप्रेरणा, संकल्पना, संकेतव्यवस्था आणि आविष्काररूप यांमध्ये अर्थातच भेद आहेत. असे असले तरी ललित साहित्यात लोकसाहित्याचे काही गुणविशेष, संकेत आढळून येतात तसेच लोकसाहित्यातही ललित साहित्याचे काही गुणविशेष, लक्षणे व संकेत दिसून येतात. या दोहोंचे घनिष्ट संबंध असून त्यांच्यामध्ये सतत देवघेव होत असते.

या पार्श्वभूमीवर भाषा-साहित्याच्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठीय स्तरावर लोकसाहित्याचा अभ्यास करणे प्रस्तुत ठरते. या दृष्टीने (१) लोकसाहित्याची संकल्पना, स्वरूप व निर्मितिप्रेरणा, (२) लोकसाहित्याची संकेतव्यवस्था, (३) लोकसाहित्याची व्याप्ती व विविध प्रकार, (४) लोकसाहित्य आणि ललित साहित्य यांचे परस्परसंबंध

आदी गोष्टींचे परिचयपर ज्ञान विद्यार्थ्यांना करून देणे, तसेच लोकसाहित्याचे वाचन / आस्वाद व अभ्यास करण्याची त्यांना यथोचित साहित्यदृष्टी देणे हे प्रस्तुत अभ्यासविषयपत्रिकेचे उद्दिष्ट आहे. या उद्दिष्टानुसार प्रस्तुत विषयाच्या अभ्यासक्रमाची योजना पुढीलप्रमाणे आखता येईल.

अभ्यासक्रमाची रूपरेषा :

I. लोकसाहित्य : स्वरूपविचार

अ) १) 'लोक' आणि 'लोकमानस'

२) 'लोकधर्म' आणि 'लोकदैवत'

३) 'लोकतत्त्व' आणि 'लोकसंस्कृती'

४) 'लोकवाङ्मय' आणि 'लोकसंस्कृती'

या संकल्पनांचे स्पष्टीकरण आणि स्वरूपदिग्दर्शन, लोकसाहित्याच्या विविध व्याख्या व लक्षणे, लोकसाहित्याची संकेतव्यवस्था, लोकसाहित्यामागील निर्मितिप्रेरणा.

ब) लोकवाङ्मय आणि लौकिक वाङ्मय यांतील साम्यभेद.

क) ललितसाहित्य आणि लोकसाहित्य यांतील साम्यभेद.

ड) ललितसाहित्य आणि लोकतत्त्वांचा संबंध.

इ) लोकसाहित्य आणि संतसाहित्य यांचे नाते.

फ) लोकसाहित्यातील सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक जाणिवा.

ग) लोकसाहित्यातील आदिबंध, प्रतीक आणि मिथक.

II. लोकसाहित्यप्रकार : संहिता व प्रयोग विचार

अ) लोकगीत

१) लोकगीत : परंपरा व स्वरूपविशेष

२) लोकगीतांतील अनुभवविश्व व आशयसूत्रे

३) लोकगीतांतील कल्पनाबंध (motif)

४) लोकगीतांची संरचना, छंद – शब्दबंध – कडव्यांची रचना – नादलय – प्रतिमा - प्रतीक योजना, श्राव्यमूल्य इत्यादी.

५) लोकगीत : गीतकाव्य व कथागीत

६) लोकगीतांचे भावकवितेला योगदान



Scanned with OKEN Scanner

७) लोकगीताची गेयता–सादरीकरणाच्या अंगाने विचार
८) समाजाशी अंतर्लक्ष्यी व बहिर्लक्ष्यी संबंध.

ब) लोककथा

१) लोककथा : परंपरा व स्वरूपविचार
२) लोककथांतील आशयसूत्रे व अनुभवविश्व
३) लोककथांतील कल्पनाबंध
४) लोककथा : संरचना कथाबीज – कथानक – पात्र – वातावरण – निवेदक – निवेदनपद्धती – भाषा इत्यादी.
५) लोककथेचे कथात्म ललित साहित्याला योगदान
६) लोककथाकथन–सादरीकरणाच्या अंगाने विचार.
७) समाजाशी अंतर्लक्ष्यी व बहिर्लक्ष्यी संबंध.

क) लोकनाट्य

१) लोकरंगभूमीची परंपरा व स्वरूप
२) लोकरंगभूमीची संकेतव्यवस्था
३) लोकनाट्य : स्वरूपविचार :
(नाट्यबीज–कथानक–पात्र–संवाद–भाषा इत्यादी)
४) लोकनाट्यप्रकार : संहिता व प्रयोगाविष्कार
(गोंधळ – जागरण – दशावतार – दिंडार – मादळ – तमाशा)

III. लोकसाहित्याच्या अभ्यासपद्धती

लोकसाहित्यप्रकारांचा अभ्यास कसा करता येईल याचे शिक्षण-प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने पुढील अभ्यासपद्धतींचा प्राथमिक परिचय करून देणे.

१) समाजजीवनाच्या संदर्भात लोकसाहित्य कोणते कार्य करते हे पाहण्याच्या उद्देशातून कार्यान्वयी पद्धती (functional method)
२) लोकसाहित्यातील विचारप्रणाली व लोकसाहित्याचे कार्य तपासण्याच्या उद्देशातून विचारप्रणालीपर पद्धती (ideological method)
३) क्षेत्रीय अभ्यास करून लोकसाहित्याचा विशिष्ट समाजाशी, संस्कृतीशी असलेला संबंध तपासणे, विधी–प्रयोग–संहिता यांचा अभ्यास करणे या उद्देशातून 'संदर्भान्वयापद्धती' (contextual method)
४) शब्द (verbal) लोकसाहित्याच्या संरचनेचे विश्लेषण करणे या उद्देशातून संरचनापद्धती (structural method)
५) मौखिक आविष्काराच्या स्वरूपविशेषाचे विश्लेषण करण्याच्या दृष्टीतून मौखिक आविष्कारसूत्रपद्धती (oral formatic method)

Scanned with OKEN Scanner

अभ्यासपत्रिका क्र. ०८ लोकसाहित्य.

सदर अभ्यासपत्रिकेअंतर्गत लोकाभिमुख (तीन) साहित्यकृतींचा प्रकारनिहाय अभ्यास (२००८ ते २०११) या तीन शैक्षणिक वर्षांसाठी नेमलेल्या साहित्यकृती

1) लोकमानसातील लोकगीते
सं. पा. रश्मी शेटे-नुपे, जगदीश संसारे आणि रामचंद्र वरक
स्नेहवर्धन प्रकाशन. पुणे

2) मराठी लोककथा - मधुकर वाकोडे.
साहित्य अकादमी, नवी दिल्ली

3) आदिवासी नाटक - रानमूळ - रमेश कुबल.
कर्मगरि प्रकाशन, पुणे.

## संदर्भ ग्रंथ.


१. *The Study of Folklore*, Alan Dundes.
२. *The Science of Folklore*, Alexander Crappe.
३. *The Golden Bough* (cambridge edition), James Frazer.
४. *My in primitive Society*, B. Malinowski.
५. *Myth, Ritual and Religion*, Andrew Lange.
६. *Images and Symbol*, Mircea Eliade.
७. *Man and His Symbols*, C. J. Jung.
८. *Myth and Reality*, D. D. Kosambi.
९. *लोकसाहित्याची रूपरेषा*, दुर्गा भागवत.
१०. *धर्म आणि लोकसाहित्य*, दुर्गा भागवत.
११. *लोकसाहित्याचे स्वरूप*, प्रभाकर मांडे.
१२. *लोकसाहित्याचे अंत:प्रवाह*, प्रभाकर मांडे.
१३. *लोकसाहित्य : स्वरूप व शोध*, रा० चिं० ढेरे.
१४. *लोकसाहित्य : शोध आणि समीक्षा*, रा० चिं० ढेरे.
१५. *लोकसाहित्य आणि संतसाहित्य*, रा० चिं० ढेरे.
१६. *लोकदैवतांचे विश्व*, रा० चिं० ढेरे.
१७. *लोकसंस्कृतीचे उपासक*, रा० चिं० ढेरे.
१८. *भारतीय रंगभूमीच्या शोधात*, रा० चिं० ढेरे.
१९. *तमाशेची नवी रूपे*, गंगाधर पाटील.
२०. *ज्ञानदेवातील ग्रामदैवतं आणि लोकगीतं*, संभाजी पगार.
२१. *लोकसाहित्य व लोकपरंपरा*, (संपा०) र० ना० वरखेडे.
२२. *लोककथा कल्पलता*, मालतीबाई दांडेकर.
२३. *मिथक आणि नाटक*, तारा भवाळकर.
२४. *रामायणाची भाषांतरे*, (संपा०) उषा जोशी.
२५. 'कथनमीमांसा', अनुष्टुभ, दिवाळी १९९१.
२६. *मऱ्हाटी लावणी*, प्रा० म० वा० धोंड.
२७. आदिवासी नाटक -स्वरूप आणि समीक्षा - डॉ. रमेश कुबल. 2005


प्रश्नपत्रिकेचे स्वरूप. (एकूण गुण 100 प्रश्न 5)
तात्त्विक अंगावर ४० गुणांचे प्रश्न असतील.
(दोन प्रश्न (प्रत्येकी २० गुणांचे) अंतर्गत पर्याय असतील.)
प्रत्येक साहित्यकृतीवर अंतर्गत पर्याय असतील.
प्रत्येकी वीस गुणांचा एक प्रश्न असेल.

—x—